# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.06.2025** **वार- शुक्रवार**

---

**प्रकाशन**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या 'वृत्तभाषा' या स्मरणिकेचं प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृहामध्ये झालं. यावेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे , सरचिटणीस मीनाक्षी गुरव , खजिनदार शिवाजी शिंदे उपस्थित होते. मराठी भाषेसाठी वृत्तमाध्यमांचं योगदान या विषयावर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे यांच्या संकल्पनेतून वृत्तभाषा ही स्मरणिका तयार करण्यात आली आहे.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२६करता पूर्णवेळ विनामूल्य निवासी प्रशिक्षणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं २७ जुलै रोजी सामाईक प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रहिवासी पुरावा असलेल्या सर्व संवर्गातील ५० विद्यार्थ्यांना सावित्रीबाई अकादमीमध्ये ११ महिन्यासाठी प्रवेश देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास व्यवस्था, प्रतिमहा चार हजार रुपये विद्यावेतन, अद्ययावत पुस्तकांसह ग्रंथालय, अभ्यासिका, व्याख्यानकक्ष इत्यादी सुविधा उपलब्ध करून

देण्यात येणार आहेत, तसंच तज्ञांचं मार्गदर्शन देखील मिळणार आहे. या प्रवेश प्रक्रीयेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत २७ जुनपर्यंत आहे.

**पालखी**

संत तुकाराम महाराजांच्या आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवडमध्ये तयारी सुरू आहे. यासाठीचा स्वागत कक्ष आणि मुक्कामाच्या स्थळाची, तसंच पालखी मार्गाची पाहणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी नुकतीच केली. वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही, याची दक्षता संबंधित विभागांनी घ्यावी, सर्व विभागांनी समन्वयाने याबाबतचं नियोजन करावं, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिका-यांना दिले.

**पुणेमनपा**

पुणे शहरातील रस्ते झाडण्यासाठी महापालिकेच्या अंदाज समितीच्या बैठकीत आज दहा टक्के वाढीव दराने फेरनिविदा काढण्यास मान्यता देण्यात आली. तसंच जुन्या अटी-शर्ती यासाठी लागू करण्यात आल्या आहेत. पुणे महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर काढण्यात आलेल्या झाडकामाच्या निविदांमध्ये 'संगनमत' झाल्याचा आरोप केला जात होता. याची शहानिशा केल्यानंतर आरोपात तथ्य आढळले होतं. त्यानंतर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी याचा अहवाल महापालिका आयुक्तांकडे सादर करून निविदा प्रक्रिया पुन्हा राबवण्याची शिफारस केली होती.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापारीवर्गाकडे विविध कामकाजासाठी अतिरिक्त शुल्काची मागणी केली जात आहे. याखेरीज, बाजार आवारात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामं सुरू असून वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. त्यापार्श्वभूमीवर बाजार समितीवर प्रशासक नेमण्याची मागणी

व्यापारी वर्गानं केली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचं संचालक मंडळ बरखास्त करून त्याठिकाणी पुन्हा प्रशासकाची नेमणूक करण्यात यावी, या मागणीचं पत्र नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं आहे.

**<u>आशास्वयंसेविकासंघ</u>**

आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यातील सुमारे 70 हजार आशा स्वयंसेविका आणि 3 हजार 500 गटप्रवर्तकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. गेल्या पाच महिन्यांपासून मानधन मिळालं नसून केंद्र आणि राज्य सरकारकडून निधीही मंजूर न झाल्याने आर्थिक कोंडी होत असल्याचा आरोप या कर्मचाऱ्यांनी केला आहे.  केंद्र आणि राज्य सरकारने आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांचे थकीत मानधन तातडीने जमा करावे; अन्यथा जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात काम बंद आंदोलन करण्याचा इशारा गटप्रवर्तक आशा स्वयंसेविका संघाचे राज्य उपाध्यक्ष नीलेश दातखिळे यांनी दिला आहे.

**<u>साथरोगआवाहन</u>**

पुणे शहर परिसरात सध्या पावसाळ्यामुळे डासांचं प्रमाण झपाट्याने वाढलं आहे. परिणामी डेंगी, चिकनगुनिया, मलेरिया आणि इतर विषाणूजन्य आजाराचे रुग्णही वाढत आहेत. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागानं केलं आहे. तसंच पंचायत समितीच्या आरोग्य विभागाने सर्व ग्रामपंचायतींना धूर फवारणीचे आदेश दिले आहेत.

**<u>करिअरफेस्ट</u>**

‘नेक्स्ट जेन करिअर फेस्ट’  या उपक्रमा अंतर्गत ‘कला आणि करिअर’  विषयावरचं चर्चासत्राचं आज पुण्यात झालं. भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्‌नं याचं आयोजन केलं होतं. यात

‘नृत्य कला आणि करियर’  या विषयावर नृत्यगुरू शमा भाटे आणि स्मिता महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात काल रात्री मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडला, आज सकाळीही हलका पाऊस झाला. आज दिवसभर आकाश अंशतः ढगाळ होतं; कमाल 30 तर किमान 21 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**